

# के.के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना दुबईत इंटर्नशिप

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षणसंस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील ११ विद्यार्थ्यांना दुबई येथील फाइव्ह जुमेराह व्हिलेज, फाइव्ह पाम जुमेराह आणि फाइव्ह लक्झ या नामांकित आंतरराष्ट्रीय कंपनीत इंटर्नशिपची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. त्यामध्ये एआय अँड डीएस चार, सीएसडी दोन, आयटी दोन, सिव्हिल दोन व मेकॅनिकल एक, अशा एकूण ११ विभागांतील विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांमध्ये आठ मुले व तीन मुलींचा समावेश आहे.

इंटर्नशिपचा कालावधी एक महिन्याचा आहे. यावेळी विद्यार्थ्यांना मानधन दिले जाणार आहे. इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य व जीवन कौशल्याबरोबरच दुबई येथील वर्ककल्चरचा अनुभव येणार असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी दिली. इंटर्नशिपसाठी निवड झालेले ११ विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे कौतुक करण्यासाठी संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दुबईत इंटर्नशिपला जाणारी तिसरी बॅच आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाला सन २०२२ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्थेचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्याअंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. यात सहा महिन्यांची उन्हाळी किंवा हिवाळी इंटर्नशिप राबविण्याचा उपक्रमही समाविष्ट आहे, अशी माहिती संस्थेचे प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी दिली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर व सर्व विभागप्रमुख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**दै.गावकरी ,दि.१६ मार्च २०२६**